# <u>अनुकंपा तत्वावर नियुक्ती</u>

अनुकंपा नियुक्ती म्हणजे वारसहक्क नाही. अनुकंपा तत्वावर नियुक्ती म्हणजे, 'क' आणि 'ड' श्रेणीतील राज्य शासकीय कर्मचारी सेवेत असतांना दिवंगत झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीत, त्याच्या कुटुंबियांना सहाय्य होऊन आर्थिक मदत मिळावी यासाठी, अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेणे. यासाठी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यु दिनांकापासून एका वर्षात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराचे वय चाळीस वर्षापेक्षा जास्त नसावे. 'अ' आणि 'ब' श्रेणीतील अधिकाऱ्यांसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्ती लागू होत नाही. तथापि, दिनांक १७/७/२००७ च्या शासन निर्णयानुसार, गट 'अ', 'ब', 'क', 'ड' श्रेणीतील शासकीय अधिकारी/कर्मचारी, नक्षलवादी/आतंकवादी/दरोडेखोर/समाजविघातक हल्ल्यात/कारवाईत मृत्यू पावल्यास, त्यांचे वारसदार अनुकंपा नियुक्तीस पात्र ठरतात.

दिनांक १/३/२००४ च्या शासन निर्णयानुसार, प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरली जातात. प्रत्येक वर्षात रिक्त झालेल्या व रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची एकत्रित गणना करुन त्याच्या १०% इतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरली जातात.

दिनांक २६/२/२०१३ च्या शासन निर्णयानुसार, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना, मुलींना देखील नेमणूक देण्याचे शासनाचे धोरण आहे. अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबियांमध्ये दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याची पती/पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी अथवा मृत्युपूर्वी कायदेशीररीत्या दत्तक घेतलेला मुलगा/अविवाहीत मुलगी, दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल तर आणि त्याच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकांव्यतिरिक्त अन्य कोणीही अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून, केवळ अविवाहीत शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहीत बहीण तसेच घटस्फोटित/परित्यक्ता/विधवा मुलगी/बहीण ही नियमानुसार पात्र नातेवाईक मानण्यात आले आहेत.

दिनांक १७/११/२०१६ च्या शासन निर्णयानुसार, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात आली असून खाली नमूद केलेले नातेवाईक अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र राहतील. खालीलपैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.

१) पती/पत्नी,

२) मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत), मृत्युपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत). दिवंगत राज्य शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबामध्ये फक्त विवाहित मुलगी हीच एकमेव आपत्य असल्यास किंवा त्यांचे कुटुंब फक्त त्या विवाहित मुलीवरच अवलंबून असेल अशा प्रकरणी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याची विवाहित मुलगी ही अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र राहील.

३) दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याचा नातेवाईकांपैकी कोणीच नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून

४) घटस्फोटित/परित्यक्ता/विधवा मुलगी किंवा बहीण

५) केवळ अविवाहीत शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहीत बहीण.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून दिवंगत कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र घेण्यात येते. अविवाहित मुलीचा विवाह अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळाल्यानंतर झाल्यास विवाहाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत तिच्या पतीकडून असे हमीपत्र घेण्यात येते. भविष्यामध्ये सदर प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन झाल्याबाबतची तक्रार संबंधित कुटुंबातील सदस्यांनी केल्यास सदर तक्रारीची चौकशी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/शिस्तभंग विषयक प्राधिकारी करू शकतात. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे सिध्द झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येते.

गट 'क' मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट 'ड' पदावर नियुक्ती दिल्यास, गट 'क' मधील पद उपलब्ध होताच त्या पदावर प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. आणि अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदावरील समजण्यात यावी. तथापि, उपलब्धतेअभावी गट 'ड' पदावर नियुक्ती देतांनाच्या नियुक्ती आदेशात तसा स्पष्ट उल्लेख असेल तरच अशी नियुक्ती देता येईल.

अनुकंपा तत्वावर टंकलेखक म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याने, टंकलेखनाच्या विहित वेग मर्यादेचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्यात प्राप्त करून सादर करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास त्याची नियुक्ती संपुष्टात आणावी अशा सूचना दिनांक ६/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. जर एखाद्या उमेदवारास नियुक्तीपासून सहा महिन्यात टंकलेखन परीक्षेची एकही संधी मिळाली नाही तर, नियुक्तीपासून प्रथम संधी मिळून त्याचा निकाल जाहीर होईपर्यंत त्या उमेदवारास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ सचिव समितीसमोर सादर करण्यासाठी विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने पाठविण्यात येतो.
जर उमेदवारास नियुक्तीपासून परीक्षेची एक संधी मिळूनही त्याने हे प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर न केल्यास त्या उमेदवाराच्या सेवा समाप्त करण्यात येतात. अशा सेवा समाप्त केलेल्या उमेदवारास दिनांक ८/९/१९९७ च्या शासन निर्णया मधील तरतुदीनुसार गट 'ड' मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येऊ शकते. तथापि, गट 'ड' पदावर अशी नियुक्ती स्वीकारल्यास पुन्हा गट 'क' मधील पदावर अधिकार सांगता येणार नाही.

दिनांक २१/११/१९९७ च्या शासन निर्णयानुसार, दिवंगत कर्मचारी ज्या कार्यालयात काम करीत होता तिथेच त्याच्या नातेवाईकाला अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करता येईल. त्या कार्यालयाने सदर अर्जाची छाननी करून, सर्व अटींची/नियमांची पूर्तता होणारे अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

दिनांक २१/११/२००२ च्या शासन निर्णयानुसार, गट 'क' मधील पदांवर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांना संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र (एम.एस.सी.आय.टी.) परीक्षा देऊन प्राप्त करून घेणे आवश्यक करण्यात आले आहे. तथापि संगणक अर्हता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करु न शकणाऱ्या उमेदवारांना पुन्हा नव्याने गट 'ड' मध्ये नियुक्ती देण्याची तरतूद नाही.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

अनुकंपाधारकांच्या प्रतिक्षासूचीमध्ये असताना वयाची ४० वर्षे पूर्ण झालेल्या उमेदवारांचे नाव अशा प्रतिक्षासूचीतून वगळल्यावर त्याने संमतीपत्र दिल्यास त्याच्याऐवजी कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचे नाव या प्रतिक्षासूचीत समाविष्ट करता येणार नाही कारण अनुकंपा नियुक्ती हा वारस हक्क नाही.

दिनांक २२/८/२००५ च्या शासन निर्णयान्वये स्वेच्छानिवृती/रुग्णतेच्या कारणास्तव सेवानिवृत/सक्तीने सेवानिवृत केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा नियुक्ती लागू होत नाही. केवळ शासकीय सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना अनुकंपा नियुक्ती लागू आहे.

बेपत्ता झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना अनुकंपा नियुक्ती लागू नाही. तथापि बेपत्ता कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याचे सक्षम न्यायालयाकडून प्रमाणपत्र घेतले असेल तर त्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत बेपत्ता कर्मचाऱ्याच्या पात्र कुटुंबीयांनी अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर केल्यास त्यांना अनुकंपा नियुक्ती लागू होईल.

सध्याच्या अनुकंपा नियुक्ती धोरणात कर्मचाऱ्याचा मृत्यू कोणत्या कारणाने झाला असल्यास त्याच्या कुटुंबीयांना अनुकंपा नियुक्ती लागू होईल याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्याच्या पात्र वारसांनाही अनुकंपा नियुक्ती लागू होईल.

दिवंगत कर्मचाऱ्यास दोन पत्नी असल्यास (धर्मानुसार) आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या दोन-तीन कुटुंबियांनी अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज सादर केल्यास त्यापैकी सक्षम न्यायालयाकडून कायदेशीर वारसदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या उमेदवारास अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होईल.

दिनांक २८/३/२००१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय नाही.

दिनांक ११/९/१९९६ च्या शासन निर्णयान्वये अज्ञान उमेदवाराने सज्ञान झाल्यावर म्हणजे त्याच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर केल्यास त्याचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेण्यात येऊ शकते.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector